**प्रेस नोट** **दि.१९/०४/२०१९**

## फरासखाना पोलिस स्टेशन

## आत्महत्या करणार अशी चिठ्ठी लिहुन घरातुन निघुन गेलेल्या तरुणीचा आठ तासांच्या आत फरासखाना पोलीसांकडुन शोध

नयना प्रकाश चाचर, वय- ४५ वर्षे, रा. कसबा पेठ, पुणे. हिने साततोटी पोलीस चौकीस येवुन फिर्याद दिली की, माझी मुलगी, वय- २० वर्षे, रा. सदर. ही कोणास काही न सांगता दुपारी ०३.३० वा चे सुमारास घरातुन ती जिवाचे बरेवाईट करुन घेण्याची चिठ्ठी लिहुन ठेवुन घरातुन निघुन गेल्याची माहिती सायंकाळी ०५.०० वा चे सुमारास दिली. त्यानंतर सदर मुलीची रितसर मिसिंग तक्रार दाखल करुन पुढील चौकीशीत असे निष्पन्न झाले की, मुलगी ही नीटच्या परिक्षेचा अभ्यास करीत होती. तीने तीन वेळा नीटची परीक्षा दिली होती. पण तिला यश आले नव्हते. या वर्षीपण तीने नीट परीक्षेची तयारी केली. पण तिचा अभ्यास झाला नव्हता. त्यामुळे ती टेन्शन मध्ये होती. असे तिच्या आई,वडीलांनी सांगितले. मुलीने घरातुन जाताना आईचा मोबाईल घेवुन गेली होती. त्यावर आम्ही सदर मोबाईलचे लोकेशन काढण्याचा प्रयत्न केला. परंतु तो बंद होता. सतत प्रयत्न करीत असताना शेवटी रात्री ९.०० वा चे सुमारास तिचे लोकेशन सिंहगड किल्ला परिसरात मिळाले. त्यावरुन तात्काळ पोलीसांनी मुलीच्या आई सह सिंहगड किल्ला परिसरात शोध घेतला. ती मुलगी बस स्टॉपवर उभी असलेली मिळुन आली. तिस परत आणुन तिचेकडे विचारपुस करता, तिने सांगितले की, मी नीट परीक्षा मागील तीन वर्षापासुन देत आहे. पण त्यात मला यश मिळत नाही. या वर्षी पण अभ्यास झाला नाही. याचे मला टेन्शन आले व त्यातुन माझ्या मनात मरण्याचा विचार आला व मी, आई,वडील व काका घरात नव्हते. तेव्हा आईचा मोबाईल घेवुन सिंहगड किल्ला येथे जाण्यास निघाले. शनिवारवाडा येथुन पी.एम.टी. बसने सिंहगड येथे पोहोचेपर्यंत रात्र झाली. त्यामुळे मी डोंगरावरील मंदीरात बसुन होती. रात्री उशीर झाला. सिंहगड येथुन परत जाणारी शेवटची बस पण गेली. तेथे लोक जमले. तेवढयात माझे आई,वडील व पोलीस पण शोध घेत येथे आले. त्यानंतर सदर मुलीस पोलीस स्टेशनला आणुन तिच्या आई समोर नेमके आत्महत्या करण्याचे कारणाबाबत श्री. किशोर नावंदे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी चौकशी केली. मुलीस समजुन सांगितले. तुला अभ्यास झेपत नसेल तर दुसरा कोर्स कर व आई वडीलांना पण सांगितले. मुलीवर दबाब आणु नका, मुलीस जो अभ्यासक्रम आवडतो. तो तिच्याकडुन करुन घ्यावा, यावर मुलगी पण स्वखुशीने तयार झाली व आई,वडीलांनी पणे ते मान्य केले. आम्ही मुलीवर तु नीटची परीक्षा दे. म्हणुन दबाव टाकणार नाही. तिला जे आवडते ते कोर्स तिने करावा. आम्ही तिच्या पाठीमागे आहोत, असे मान्य केले. अशा प्रकारे आई,वडील व मुलीकडुन जी अपेक्षा करते. त्यामुळे मुलीस टेन्शन येवुन ती आत्महत्येपर्यंत टोकाची भुमिका घेतली होती. ते सर्व समुपदेशाने दुर झाली. आनंदानी मुलगी आई,वडीलांच्या सोबत घरी गेली आहे.

सदर कार्यवाही किशोर नावंदे सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. महादेव लिंगे, पोलीस उप निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे. व पोलीस कर्मचारी यांनी कारवाई केली आहे.